महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १७८ वे | दिनांक : २३/०६/२०२६ | वार : मंगळवार

# विधान परिषदेत महायुतीचा डंका! महाविकास आघाडीचा सुपडा साफ



**नाशिक :** विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा आज निकाल लागला. ही निवडणूक महायुतीने प्रचंड मतांनी विजयी केली आहे. तसेच महाविकास आघाडीचा अतिशय दारुण पराभव याही निवडणुकीत पाहायला मिळाला आहे. असे असले तरी अनेक मतदारसंघातील विजय तसेच पराभव चर्चेचा विषय ठरत आहे. कुठे क्रॉस व्होटिंग झाली, तर कुठे अंतर्गत नाराजीचा फटका बसला आहे. जाणून घेऊया कोणत्या मतदारसंघात काय घडामोडी घडल्या.

**1) नाशिकः क्रॉस व्होटिंग, अंतर्गत नाराजी आणि विश्वासघात**

नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांचा धक्कादायक पराभव झाला, तर भाजपमधून बंडखोरी करणारे अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांनी पहिल्याच फेरीत विजयाचा कोटा पार करत दणदणीत विजय मिळवला. क्रॉस व्होटिंग, अंतर्गत नाराजी आणि विश्वासघातामुळे या ठिकाणी दराडेंचा पराभव झाल्याचे बोलले जात आहे. या ठिकाणी एकूण 618 मतदारांनी मतदान केले. त्यापैकी 13 मते अवैध ठरली, तर 605 मते वैध ठरली. विजयासाठी 303 मतांचा कोटा होता. मतमोजणीत गोकुळ गितेंना तब्बल 357 मते मिळाली, तर महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांना केवळ 248 मतांवर समाधान मानावे लागले. या निवडणुकीतले उमेदवार प्रसाद हिरे यांना एकही मत मिळाले नाही.

धाराशिव-लातूर-बीड विधा परिषद निवडणुकीत ठाकरे गटाचे बंडखोर खासदार ओमराजे निंबाळकर यांनी महाविकास आघाडीची मते भाजपच्या बसवराज पाटील यांच्या खात्यात वळवल्याचे समोर आले आहे. महाविकास आघाडीची येथे चक्क दीडशे मते फुटल्याची शक्यताय. या ठिकाणी बसवराज पाटील यांना 845 मते मिळाली. तर काँग्रेसच्या महेश देशमुख यांना फक्त 124 मतांवर समाधान मानावे लागले. या ठिकाणी 14 मतपत्रिका कोऱ्या निघाल्या, तर 14 मते बाद झाली आहेत. ओमराजेंच्या खेळीमुळे या ठिकाणी काँग्रेसच्या हाती भोपळा आल्याचे दिसते.

**3) सांगलीः महायुतीचा उमेदवार विजयी, पण मते फुटली**

सांगली-सातारा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत भाजपचे उमेदवार धैर्यशील कदम यांनी दणदणीत विजय मिळवला. त्यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार अभयसिंह जगताप (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार ) यांचा तब्बल 301 मतांनी पराभव केला. हा निकाल राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांच्यासाठीही मोठा धक्का आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीत महायुतीची सुमारे 100 मते फुटली. सांगली आणि साताऱ्यात भाजप व शिंदे गटातील स्थानिक नेत्यांमधले मतभेद जगजाहीर होते. वरिष्ठ नेत्यांनी अनेक बैठका घेऊन समन्वय साधण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा काही परिणाम झाला नसल्याचे दिसते.

**4) छत्रपती संभाजीनगर: भाजप उमेदवार विजयी, ओबीसी सोशल इंजिनिअरिंग प्रयोग यशस्वी**

अपेक्षेप्रमाणे विधान परिषदेच्या छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महायुतीने बाजी मारली असून, भाजपचे उमेदवार सुहास शिरसाठ यांनी 455 मते मिळवत दणदणीत विजय मिळवला आहे. एकूण 637 पैकी 630 मतदारांनी बजावलेल्या या मतदानात 5 मते बाद ठरली, तर विजयासाठी आवश्यक असलेला 313 मतांचा कोटा शिरसाठ यांनी सहज पूर्ण केला. ज्यामध्ये त्यांच्या विरोधातील शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार गणेश लोखंडे यांना 135 आणि अपक्ष इसाक संदूक खान यांना केवळ 35 मतांवर समाधान मानावे लागले. फुलंब्री येथील माळी समाजाचे नेते असलेले सुहास शिरसाठ विजयी झाल्याने या निवडणुकीकडे महायुतीचा यशस्वी 'ओबीसी सोशल इंजिनिअरिंग' प्रयोग म्हणून पाहिले जात आहे.

**5) नांदेड: भाजपला यश, अशोक चव्हाणांच्या नेतृत्वाला श्रेय**

नांदेड विधान परिषद मतदारसंघातून भाजपला प्रथमच यश मिळवून देत अमरनाथ अनंतराव राजूरकर विजयाची हॅट्रिक केली आहे. प्रतिस्पर्धी उमेदवार कृष्णा पाटील आष्टीकर यांचा अडीचशे पेक्षा अधिक मतांनी त्यांनी पराभव केला आहे. राजूरकर यांना 339 मते मिळाली, तर आष्टीकर यांना 84 मते मिळाली आणि वंचितचे प्रशांत इंगोले यांना अवघे पाच मते मिळाली आहेत. इथल्या मतदानात तब्बल 23 मते बाद ठरवण्यात आली. या विजायमागे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना श्रेय दिले जात आहे. चव्हाण यांच्या नेतृत्वात स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात त्यांनी भाजपला प्रथमच विजय मिळवून दिला आहे.

**6) सोलापूरः महायुतीचा विजय, पालकमंत्र्यांचे सूक्ष्म नियोजन अन् विरोधकांचीही साथ**

सोलापूरमधून भाजपचे राजेंद्र राऊत यांना 483 मते मिळाली असून महायुती विजयी झाली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री गोरे आणि खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. जिल्ह्यात 11 आमदार विधानसभेचे आहेत. या विजयाने जिल्ह्यातील 12 वा आमदाराचा मान राऊत यांना मिळाला आहे. पालकमंत्री गोरे यांनी याही निवडणुकीत गाफील न राहता निवडणुकीचे सूक्ष्म नियोजन केले होते. स्थानिक आघाडी, नाराजी निधी वाटपा संदर्भातील तक्रारी या सर्वांची दखल घेत तातडीने सोडविण्याचे वचन दिले होते. तसेच जिल्ह्यातील नगरपालिका, महापालिका आणि जिल्हा परिषदेमधील बहुमताच्या जोरावर स्वतःची 307 मते निश्चित असल्याने या निवडणुकीत भाजपने सुरुवातीपासूनच विजयाचा ठाम दावा केला होता. या भक्कम आकडेवारीला महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्या साथीची जोड मिळालीच. पण त्यासोबतच विरोधी पक्षात असलेल्या राष्ट्रवादी शरद पवार गट करमाळा, माढा व माळशिरस येथील आमदारांनी, सांगोल्याच्या शेकाप आमदाराने आणि जिल्ह्यातील इतर स्थानिक आघाड्यांनीही भाजप उमेदवाराला खुला पाठिंबा दिल्याने त्यांचे पारडे या निवडणुकीत पूर्णपणे जड झाले.

**7) नागपूर: काँग्रेसची मते फुटली, डॉ. राजीव पोतदार 682 मतांनी विजयी**

नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ पोटनिवडणुकीत महायुतीचे (भाजप) उमेदवार डॉ. राजीव पोतदार यांनी 682 मते मिळवत दणदणीत विजय संपादन केला आहे, तर काँग्रेसचे उमेदवार अतुल लोंढे यांना त्यांच्या पक्षाचे 169 मतदार असतानाही केवळ 130 मतांवर समाधान मानावे लागले. या निवडणुकीत भाजपच्या या मोठ्या विजयाचे मुख्य कारण म्हणजे काँग्रेसच्या मतांमध्ये झालेली मोठी फूट आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची यशस्वी राजकीय रणनीती. ज्या माध्यमातून त्यांनी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या पाठिंब्यावर निवडून आलेल्या 'बुटीबोरी विकास परिवर्तन' पॅनलच्या नगरसेवकांची भेट घेऊन त्यांची सर्व मते भाजपच्या बाजूने वळवण्यात यश मिळवले.

**8) भंडारा: महायुतीचा विजय, पण 'क्रॉस व्होटिंग'चीच चर्चा**

भंडारा-गोंदिया विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे उमेदवार अविनाश ब्राह्मणकर यांनी 302 मते मिळवून विजय संपादन केला असला तरी, या निकालात महायुतीच्या विजयापेक्षा झालेल्या 'क्रॉस व्होटिंग'चीच सर्वाधिक चर्चा आहे. महायुतीचे भक्कम संख्याबळ, संघटनात्मक ताकद आणि भाजपने बजावलेला सक्त पक्षादेश (व्हीप) यांच्या बळावर ब्राह्मणकर यांचा विजय निश्चित झाला. मात्र काँग्रेस समर्थित अपक्ष उमेदवार नरेश ईश्वरकर यांनी अनपेक्षितपणे 154 मते मिळवल्याने महायुतीतील अंतर्गत अस्वस्थता उघड झाली आहे. महायुतीमधील तब्बल 35 मतदारांनी अंतर्गत नाराजीतून पक्षादेश झुगारून 'क्रॉस व्होटिंग' करत आपल्याच पक्ष नेतृत्वाला अप्रत्यक्ष इशारा दिल्याचे मानले जात आहे. दुसरीकडे, काँग्रेस नेते नाना पटोले, डॉ. प्रशांत पडोळे आणि इतर स्थानिक नेत्यांनी कोणताही गाजावाजा न करता मतदारांशी साधलेला प्रभावी थेट संपर्क आणि योग्य नियोजनामुळेच महायुतीची मते फोडण्यात यश आल्याचा दावा करत काँग्रेसने या निकालाला आपला नैतिक विजय मानले आहे.

विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपचे उमेदवार प्रवीण पोटे यांनी पहिल्याच फेरीत 390 (92.63 टक्के) मते मिळवून दणदणीत विजय नोंदवत 'हॅटट्रिक' साधली आहे. या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या नीलेश विश्वकर्मा यांना 31 मते मिळाली, तर काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांना एकही मत मिळवता आले नाही. प्रवीण पोटे यांच्या या एकतर्फी आणि विक्रमी विजयाचे प्रमुख कारण म्हणजे काँग्रेसमधील गोंधळ. काँग्रेसने स्थानिक नेत्याला डावलून बाहेरचा उमेदवार दिल्याने उफाळून आलेली नाराजी, ऐन प्रचारात उमेदवाराचे आजारपण आणि उमेदवार भाजपला 'मॅनेज' झाल्याच्या संशयातून स्थानिक काँग्रेस नेत्यांनी मतदानावर टाकलेला बहिष्कार यामुळे पोटे यांचा विजयाचा मार्ग पूर्णपणे निर्विवाद आणि सोपा झाला.

# माहिती अधिकाराची धार बोथट केल्यास प्राणाची आहुती देईन : अण्णा हजारे



**अहिल्यानगर :** "माहितीचा अधिकार (RTI) हा शासनाने जनतेवर केलेला उपकार नसून तो नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र, राज्य सरकारने १२ जून २०२६ रोजी प्रसिद्ध केलेले 'महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६' हे या कायद्याची धार बोथट करणारे आणि भ्रष्टाचाराला ढाल देणारे आहेत. प्रशासनातील ही हुकूमशाही मोडून काढण्यासाठी आणि माहितीचा अधिकार वाचवण्यासाठी मी माझ्या प्राणाची आहुती देण्यासही मागे हटणार नाही," असा थेट आणि निर्वाणीचा इशारा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राज्य सरकारला दिला आहे.

या संदर्भात अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक सविस्तर आणि कडक पत्र पाठवले असून, १२ जूनच्या बेकायदेशीर दुरुस्त्या त्वरित रद्द न केल्यास ५ जुलै २०२६ पासून राळेगणसिद्धी येथील यादवबाबा मंदिरात आमरण उपोषण सुरू करणार असल्याचा इशारा दिला आहे.

**माहिती देणे हा नियम, नाकारणे हा अपवाद असायला हवा**

अण्णा हजारे यांनी पत्रात नमूद केले आहे की, १९९८ पासून त्यांनी माहितीच्या अधिकारासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे केले आणि अनेकदा ऐतिहासिक उपोषणे केली. मात्र, २० वर्षांनंतर सरकारने केलेल्या नवीन दुरुस्त्या या कायद्याचा मूळ आत्माच नष्ट करणाऱ्या आहेत. जनतेला विश्वासात न घेता हे नियम तयार करण्यात आले असून, यामुळे 'माहिती देणे अपवाद आणि माहिती नाकारणे हाच नियम' अशी उलटी परिस्थिती निर्माण होईल, अशी भीती अण्णा हजारे यांनी व्यक्त केली आहे.

**अण्णा हजारे यांनी पत्रात आक्षेप घेतलेले '९' प्रमुख मुद्दे**

1.**ओळखपत्र जोडण्याची बेकायदेशीर सक्ती** : कायद्याच्या कलम ६(२) नुसार अर्जदाराला वैयक्तिक तपशील देण्याची गरज नाही. ओळखपत्र सक्तीचे केल्याने माहिती मागणाऱ्यांची गोपनीयता धोक्यात येईल आणि भ्रष्टाचार उघड करणाऱ्या 'व्हिसलब्लोअर्स'च्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होईल.

2.**माहिती मागण्याचे कारण विचारणे** : लोकशाहीत नागरिक मालक आणि शासन लोकसेवक आहे. नागरिकाने माहिती का मागितली याचा जाब विचारण्याचा अधिकार अधिकाऱ्यांना नाही. यामुळे अधिकारी मनमानी पद्धतीने अर्ज फेटाळू शकतात.

3.**तर्कहीन शुल्कवाढ** : आरटीआय हा महसूल गोळा करण्याचा कायदा नाही. जर नागरिकांवर आर्थिक भार वाढवला, तर माहिती न देणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांच्या दंडाची रक्कम का वाढवली नाही? हा एकतर्फी अन्याय आहे.

4.**'एक विषय — एक अर्ज'ची जाचक अट** : प्रशासकीय निर्णय एकमेकांशी जोडलेले असतात. या अटीमुळे सर्वसामान्य नागरिकांना एकाच कामासाठी अनेक अर्ज करावे लागतील, ज्यामुळे वेळ आणि पैसा दोन्ही वाया जाईल.

5.**पुनरावृत्ती अर्ज निकाली काढण्याची तरतूद** : अनेकदा अधिकारी अपूर्ण किंवा खोटी माहिती देतात. अशा वेळी पुन्हा अर्ज करावा लागतो. केवळ "पूर्वी माहिती दिली होती" हे कारण पुढे करून अर्ज फेटाळणे म्हणजे भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्यासारखे आहे.

6.**सुनावणीला गैरहजर राहिल्यास अपील फेटाळणे** : कामाच्या व्यापामुळे किंवा नोटीस उशिरा मिळाल्याने नागरिक गैरहजर राहू शकतात. अशा वेळी उपलब्ध कागदपत्रांवरून निकाल देण्याऐवजी अपील थेट निकाली काढणे दोषी अधिकाऱ्यांच्या पथ्यावर पडणारे आहे.

7.**अर्जदाराच्या मृत्यूनंतर केस बंद होणे** : सुनावणी प्रलंबित असताना अर्जदाराचा मृत्यू झाल्यास केस बंद करण्याचा नियम अत्यंत चुकीचा आहे. कोर्टाप्रमाणेच येथेही त्यांच्या वारसांना केस चालवण्याचा अधिकार मिळाला पाहिजे.

8.**वकिलांची मदत घेण्यास बंदी** : माहिती आयोग ही एक अर्ध-न्यायिक संस्था आहे. सर्वसामान्य नागरिकांना कायदेशीर क्लिष्टता समजत नाही. अशा वेळी त्यांना वकिलांची मदत घेण्यापासून रोखणे म्हणजे न्याय नाकारण्यासारखे आहे.

9.**'सुओ-मोटो' (कलम ४) कडे दुर्लक्ष** : शासनाने स्वतःहून सर्व माहिती (अर्थसंकल्प, निविदा, खर्च) वेबसाईटवर अद्ययावत केली, तर नागरिकांना अर्ज करण्याची गरजच पडणार नाही. मात्र, या मूळ त्रुटी दूर करण्याऐवजी नागरिकांवरच निर्बंध लादले जात आहेत.

**महाराष्ट्राचा आदर्श पायदळी तुडवू नका**

"२००२ मध्ये महाराष्ट्राने देशात सर्वप्रथम आदर्श माहिती अधिकार कायदा करून देशाला दिशा दाखवली होती. आज त्याच महाराष्ट्रात असे काळे कायदे लागू होत आहेत. याचे अनुकरण इतर राज्यांनी केल्यास देशातील पारदर्शकता संपुष्टात येईल," अशी खंत अण्णांनी व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून या जाचक तरतुदी मागे घ्याव्यात, अन्यथा ५ जुलैपासून राळेगणसिद्धीमध्ये पुन्हा एकदा आंदोलनाची ठिणगी पडेल, असे अण्णा हजारे यांनी पत्राच्या शेवटी ठणकावून सांगितले आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २३ जून २०२६


## ऊसतोड कामगारांची नोंदणी तातडीने आणि अचूकपणे पूर्ण करावी - आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे




**बीड, दि.२२ (भगवंत पाळवदे):-** राज्यातील ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी आणि त्यांना विविध शासकीय योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या ओळखपत्र वितरण प्रक्रियेला आता गती देणे गरजेचे आहे. तरी जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांची नोंदणी तातडीने आणि अचूकपणे पूर्ण करावी, असे कडक निर्देश महाराष्ट्र राज्याच्या समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून त्यांना ओळखपत्र वितरीत करणेबाबत बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, समाज कल्याण सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांची प्रमुख तर सर्व तहसीलदार व गट विकास अधिकारी यांची व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ऑनलाईन उपस्थिती होती. दीपा मुधोळ-मुंडे म्हणाल्या की, ऊसतोड कामगारांचे जीवन सुरक्षित आणि स्थिर करण्यासाठी ही नोंदणी अत्यंत महत्त्वाची आहे. यात कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवून हे काम मिशन मोडवर पूर्ण करावे. ऊसतोड कामगारांना अधिकृत ओळखपत्र देण्यासाठी प्रशासनाने गावपातळीवर एका विशेष समितीची स्थापना करण्यात येत आहे. यामध्ये ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, आशा कार्यकर्त्या आणि अंगणवाडी सेविका यांचा समावेश आहे. ही समिती गावातील सर्व ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून त्यांची अचूक यादी तयार करेल. तयार केलेली यादी मंजुरीसाठी सहाय्यक गट विकास अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली जाईल. सहाय्यक गट विकास अधिकारी या यादीची पडताळणी करून ओळखपत्र तयार करण्यासाठी अंतिम मंजुरी देतील. महाराष्ट्र राज्यासाठी स्मार्ट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या नामांकित संस्थेकडून सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या संस्थेच्या माध्यमातून आधुनिक पद्धतीने डेटा संकलित केला जाईल, जेणेकरून एकही पात्र ऊसतोड कामगार नोंदणीपासून वंचित राहणार नाही. असेही त्यांनी सांगितले. बीड जिल्हयात ऊसतोड कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे या महामंडळाच्या योजनांचा जिल्ह्यातील सर्व पात्र कुटुंबांना लाभ व्हावा यासाठी संबंधितांकडे ओळखपत्र उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे. तरी ऊसतोड कामगारांचे सर्व्हेक्षण व त्यांची नोंदणी करुन त्यांना ओळखपत्र उपलब्ध करुन देण्याचे कामकाज युद्धपातळीवर पुर्ण करणे आवश्यक आहे. अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली. सर्व गटविकास अधिकाऱ्यांनी संबंधित संस्था स्मार्ट सर्व्हिसेस. प्रा. लि.पुणे यांच्याशी समन्वय साधून सदरचे कामकाज दि.१५ ऑगस्ट, २०२६ पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील गावपातळीवरील सर्व समितीमधील ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, आशा व अंगणवाडी सेविका यांची तातडीने बैठक घ्यावी. क्षेत्रीय स्तरावर काम करताना येणाऱ्या अडचणी दूर करून त्वरित प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करावी. असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी यावेळी दिले

## किनगाव राजा येथे पेरणीपूर्व पावसाचे जोरदार आगमन; काही घरांची पडझड





**बुलढाणा (महेश मुंढे) :** किनगाव राजा परिसरात सोमवारी सायंकाळी पेरणीपूर्व जोरदार पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या या मुसळधार पावसामुळे गावातील जनजीवन काही काळ विस्कळीत झाले. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे काही कच्च्या घरांचे नुकसान झाले असून काही ठिकाणी घरांच्या भिंती कोसळल्याच्या घटना घडल्या. मात्र, या पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.गेल्या काही दिवसांपासून परिसरात उष्णतेची तीव्रता वाढली होती. त्यामुळे शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत होते. सोमवारी दुपारनंतर वातावरणात अचानक बदल होऊन काळे ढग दाटून आले. त्यानंतर वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. सुमारे एक ते दीड तास झालेल्या पावसामुळे रस्त्यांवर पाणी वाहू लागले.दरम्यान, गावातील काही जुन्या व कच्च्या घरांची पडझड झाली. काही घरांच्या पत्र्यांचे नुकसान झाले असून घरगुती साहित्याचेही नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती मिळाली नाही, ग्रामपंचायत प्रशासनाने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरु करण्याची ग्रामस्थ मागणी करत आहेत.या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पेरणीपूर्व झालेल्या या पावसामुळे जमिनीत ओलावा निर्माण झाला असून आगामी खरीप हंगामासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. सोयाबीन, कापूस, तूर व इतर पिकांच्या पेरणीसाठी हा पाऊस लाभदायक ठरणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. गावातील शेतकरी म्हणाले की,जरी पाऊस वेळेवर झालेला नसला तरी या पावसामुळे शेतीकामांना गती मिळणार आहे. पेरणीची तयारी सुरू करण्यात येणार असून यंदाचा हंगाम चांगला जाईल, अशी अपेक्षा आहे.

एकीकडे काही घरांचे नुकसान झाले असले तरी पेरणीपूर्व झालेल्या या जोरदार पावसामुळे संपूर्ण परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. प्रशासनाने नुकसानग्रस्त कुटुंबांना तातडीची मदत देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.






## जयभवानी महाविद्यालयात योग दिन उत्साहात साजरा



**पाटोदा (प्रतिनिधी) दि. २१ जून :** शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी दैनिक योग आवश्यक आहे! असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी केले ते जयभवानी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे होते. आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाचे रासेयो व क्रिडा विभागाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी क्रिडा विभागाचे प्रा. गोपाळ धांडे व श्री. दत्ता चादर यांनी काही योग प्रकाराचे प्रशिक्षण दिले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचलन प्रा. बाळासाहेब जोशी यांनी केले तर आभार क्रिडा विभागाचे प्रा.गोपाळ धांडे यांनी मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २३ जून २०२६

## जास्वंद

किती छान दिसतो
पाच पाकळ्यांचा जास्वंद
पाहून त्याचे रूप
मनास होई आनंद

लाल, पांढरा, पिवळा
सजतो नाना रंगात
हवेची झुळूक येता
नाचतो आपल्या ढंगात

परागांनी सजलेला
शोभून दिसतो तूरा
गणपतीला वाहतांना
मनी आनंद न्यारा

काळे व मुलायम
केसांना सदा ठेवतो
सुगंध नसला तरी
सर्वांना तो भावतो

नक्षीदार नाजूक पाकळ्या
मन वेधून घेती
उन पावसात राहूनी
आपणास आनंद देती



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## कुटुंबाचा आधार बाप

प्रत्येकाच्या घराघरात,
राबणारा बाप असतो.
सदा सर्वदा तारणारा,
कुटुंबाचा आधार असतो. १

बाप असतो सर्वांसाठी,
दिवस रात्र राबणारा.
स्वतः दु:ख सहन करून,
मुला बाळास पोसणारा. २

लाड सर्वांचे पुरवून,
स्वतः मात्र दूर बसतो.
सर्वांना आनंदी पाहून,
मनातल्या मनात हसतो. ३

संकट काळात सर्वांना,
तोच एक मार्ग दिसतो.
प्रत्येकाला जाणणारा,
फक्त घरात बाप असतो. ४

सुख दु:खात आधार,
बाप असतो प्रत्येक घरात.
म्हणून म्हणतो माणसा,
बापाला जपावेच उरात. ५

बाप घरात असतांना,
मोल कधी कळत नाही.
बाप निघून गेल्यावर,
चहु दिशेला वाट पाही. ६

बापाचे सुख दु:ख जाणावे,
सदा बाप जिवंत असतांना.
अनेक जणांना पाहिलंय,
बाप गेल्यानंतर रडतांना. ७

बाप काय असतो मित्रांनो,
बाप झाल्यावरच कळते.
बाप नावाची उपाधी ही,
दु:ख भोगल्यावर मिळते. ८

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, आरोग्यवर्धिनी समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल होत्या. यावेळी आंतरराष्ट्रीय योगपटू व योगमार्गदर्शक बापू सोनवणे, योग शिक्षिका सौ. सुनीता बोरुळकर, ॲड. माधुरी गि-हे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. रजनी सेनाड व डॉ. महानंदा दळवी, डॉ. मनीषा वाघमारे तसेच पर्यवेक्षक रवींद्र परभाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आंतरराष्ट्रीय योगपटू व योगमार्गदर्शक बापू सोनवणे यांनी योगाचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, "आजच्या धावपळीच्या, तणावग्रस्त आणि स्पर्धात्मक जीवनात निरोगी राहण्यासाठी योग हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. योग आणि प्राणायामामुळे शरीर सुदृढ राहते, मन प्रसन्न राहते आणि जीवनात सकारात्मकता निर्माण होते. वाढत्या वयात आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी तसेच विविध आजारांपासून दूर राहण्यासाठी नियमित योगाभ्यास अत्यंत आवश्यक आहे. योग हा केवळ व्यायाम नसून जीवन जगण्याची एक शिस्तबद्ध पद्धत आहे. प्रत्येकाने योग आणि प्राणायाम आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा."यावेळी त्यांनी विविध योगासनांचे व प्राणायामांचे प्रात्यक्षिक करून उपस्थितांकडून प्रत्यक्ष सरावही करून घेतला.कार्यक्रमात गार्गी ढोबळे आणि निधी बारबले या चिमुकल्या विद्यार्थिनींनी विविध योगासनांची आकर्षक प्रात्यक्षिके सादर केली. त्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त टाळ्यांच्या गजरात दाद देत कौतुकाचा वर्षाव केला.अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल यांनी उपस्थितांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, "योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. निरोगी शरीर, शांत मन आणि सकारात्मक विचार यांचा संगम योगातून साध्य होतो. आजच्या तंत्रज्ञानप्रधान आणि व्यस्त जीवनशैलीत प्रत्येकाने दररोज काही वेळ योगासाठी दिला पाहिजे. नियमित योगाभ्यासामुळे व्यक्तीचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते आणि समाजही अधिक निरोगी व सक्षम बनतो."कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. सविता मनोहर यांनी केले.

कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमातून योगाचे महत्त्व अधोरेखित करत निरोगी जीवनाचा संदेश देण्यात आला.

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

## MSBTE परीक्षेत श्री छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ फार्मसीची यशाची परंपरा कायम



**कन्नड, प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE) आयोजित उन्हाळी २०२६ परीक्षेत श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, कन्नड संचलित श्री छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ फार्मसी (DTE Code : 2655) यांनी शंभर टक्के निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.डी. फार्मसी द्वितीय वर्षाच्या निकालात पल्लवी गोरख पवार हिने ७५.५५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. चंचल राजेश पवार (७५.३६ टक्के), सुप्रिया अजिनाथ गायके (७४.४६ टक्के), राधिका अनिल राऊत (७३.३६ टक्के) आणि पूजा ज्ञानेश्वर जाधव (६९.०० टक्के) यांनी अनुक्रमे पुढील क्रमांक मिळविले.डी. फार्मसी प्रथम वर्षाच्या निकालात शेख खुबैब अब्दुल अलीम याने ७९.६० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. त्यापाठोपाठ जाधव अनुजा अरुण (७७.१० टक्के), पवार वैष्णवी संदीप (७७.०० टक्के), शेख तस्मिया मोहम्मद जाबेर (७६.४० टक्के) आणि जाधव शितल एकनाथ (७३.०० टक्के) यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.महाविद्यालयाने प्राप्त केलेला निकाल हा विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि संस्थेच्या शैक्षणिक बांधिलकीचे फलित असल्याचे प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर यांनी सांगितले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे प्रमुख मा. मानसिंह पवार साहेब, पदाधिकारी श्री. चंद्रकांत अण्णा देशमुख, श्री. कृष्णा पाटील, डॉ आनंद महाले, श्री बाबासाहेब मोहिते, डॉ. विजय भोसले व इतर पदाधिकारी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.महाविद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातून विद्यार्थ्यांवर आणि संस्थेवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, फार्मसी शिक्षण क्षेत्रातील महाविद्यालयाची गुणवत्ता पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २३ जून २०२६


## स्वच्छतेच्या प्रवाहाकडे माणूसपण ओळताना

"पाणी हेच जीवन" ही म्हण आपण अनेकदा ऐकतो. परंतु पाण्याचे खरे महत्त्व समाजाला तेव्हा समजते जेव्हा पाण्याची टंचाई निर्माण होते. आज महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांमध्ये पाणी संवर्धन, नदी-नाले स्वच्छता आणि घाट स्वच्छता याबाबत जनजागृती वाढत आहे. ही एक अत्यंत सकारात्मक बाब आहे.सध्या अनेक ठिकाणी नागरिक, सामाजिक संस्था, युवक मंडळे आणि स्वयंसेवी संघटना एकत्र येऊन नदीघाट, तलाव, ओढे आणि जलस्रोत स्वच्छ करण्याचे काम करत आहेत. वर्षानुवर्षे साचलेला कचरा, प्लास्टिक आणि गाळ काढून जलस्रोतांना नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न सुरू आहे. या कामामुळे केवळ पाण्याची गुणवत्ता सुधारत नाही तर पर्यावरणाचेही संरक्षण होते.विशेष आनंदाची बाब म्हणजे या उपक्रमांमध्ये युवा पिढी मोठ्या उत्साहाने सहभागी होत आहे. मोबाईल आणि सोशल मीडियाच्या जगात रमणारी तरुणाई आता श्रमदानाचे महत्त्व ओळखू लागली आहे. सुट्टीच्या दिवशी अनेक युवक-युवती नदी, तलाव आणि घाट स्वच्छ करण्यासाठी स्वतःहून पुढे येत आहेत. त्यांचे हे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे.श्रमदान ही केवळ काम करण्याची प्रक्रिया नसून ती समाजाप्रती असलेल्या जबाबदारीची जाणीव आहे. जेव्हा एखादा युवक आपल्या हाताने कचरा उचलतो, नदीचा घाट स्वच्छ करतो किंवा झाडे लावतो, तेव्हा तो केवळ पर्यावरण संवर्धन करत नसतो तर माणूसपणाची खरी ओळख निर्माण करत असतो. स्वच्छतेच्या या प्रवाहातून सामाजिक एकता, सहकार्य आणि संवेदनशीलता वाढत आहे.आजची गरज आहे की प्रत्येक नागरिकाने पाण्याचे महत्त्व समजून घ्यावे आणि जलस्रोतांच्या संरक्षणासाठी आपला सहभाग नोंदवावा. शासनाच्या योजनांसोबत लोकसहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. प्रत्येक गावात, प्रत्येक शहरात स्वच्छता आणि जलसंवर्धनाची चळवळ उभी राहिली तर भविष्यातील पाणी संकट मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.स्वच्छ घाट, स्वच्छ नदी आणि स्वच्छ पर्यावरण ही केवळ विकासाची नव्हे तर संस्कृतीचीही ओळख आहे. स्वच्छतेच्या या प्रवाहाकडे पाहताना आपण खऱ्या अर्थाने माणूसपण ओळखत आहोत. समाजहितासाठी श्रमदान करणारे हात आणि पर्यावरण वाचवण्यासाठी पुढे येणारी युवा पिढी हीच आपल्या उज्ज्वल भविष्यातील आशा आहे.चला, आपणही एक पाऊल पुढे टाकूया—पाणी वाचवूया, जलस्रोत स्वच्छ ठेवूया आणि माणुसकीचा हा प्रवाह अखंड वाहता ठेवूया. सामाजिक बदलाच्या पाणी संवर्धनाच्या साठी प्रत्येकाने दोन पावलं पुढे चालण्याची अत्यंत आवश्यक आहे येणारा काळ पाणी बचतीसाठीच असेल जल जंगल संवर्धनाचा असेल आणि माणूसपण जपण्याचा असेल यात आपली भागीदारी जास्त हवीच.

**लेखक:- भूमिपुत्र वाघ**

## मातोश्री शासकीय ई.बी.सी. मुलांच्या वसतिगृह प्रवेशासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज करावेत

**बीड, दि.२२ (भगवंत पाळवदे)** : बीड येथील धानोरा रोडवरील चांदमारी परिसरात असलेल्या मातोश्री शासकीय ई.बी.सी. मुलांचे वसतिगृह येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीची प्रवेश प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली आहे. या वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या गरजू व पात्र विद्यार्थ्यांनी आपले अर्ज वेळेत सादर करावेत, असे आवाहन वसतिगृह प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. माध्यमिक विभाग, उच्च माध्यमिक विभाग,महाविद्यालयीन विभाग, आय.टी.आय., आणि तंत्रनिकेतन विभागातील प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी दि. २२ जून २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत आपले प्रवेश अर्ज सादर करायचे आहेत. सर्व शासकीय सुट्ट्यांचे दिवस वगळून, कार्यालयीन वेळेत हे अर्ज स्वीकारले जातील. विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज सर्व आवश्यक व योग्य कागदपत्रांसह अंतिम मुदतीच्या आत परिपूर्ण भरून कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी मागील शैक्षणिक वर्षात याच वसतिगृहात प्रवेश घेतला होता आणि त्यांना या वर्षी पुनर्प्रवेश हवा आहे, अशा जुन्या विद्यार्थ्यांसाठी किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे. ही गुणांची अट पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनीच पुनर्प्रवेशासाठी अर्ज सादर करावा. असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# ३२ वर्षानंतर "लाड" कसे पुरवता येतील? जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांचा सवाल



**दिल्ली(प्रतिनिधी)** सर्वोच्च न्यायालयाच्या माधुरी पाटील विरुद्ध अतिरिक्त आयुक्त आदिवासी विकास ठाणे या प्रकारणातील २ सप्टेंबर १९९४ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या घटना पीठाचा निर्णय झाला आहे.याला आता ३२ वर्षा पेक्षा जास्त कार्यकाळ संपलेला असल्यामुळे ३२ वर्षानंतर " लाड " कसे पुरवता येतील ? असा महत्वाचा कायदेशीर व घटनात्मक सवाल राज्य शासनाच्या एका प्रतिनिधीने मराठवाड्या तील आरक्षणा बाबत +केंद्र शासनाच्या सॉलिसीटर जनरल कडे विचारणा केल्यावर अंतिम निर्णय घेतला जाईल या अनुषंगाने जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी ही घटनात्मक त्रुटीची बाब पहिल्यांदाच पुढे आणली आहे.मराठा आरक्षण एस ओ पी व नविन शासनादेश या बाबत आपले मत व्यक्त करतांना ते म्हणाले की,माधुरी पाटील या प्रकरणाचा न्यायनिवाडा सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापिठाने केलेला आहे या निर्णयात अर्जदार यांची वंशावळ महसूल पुराव्या आधारे आणि संपूर्ण नावाच्या आधारे जोडणारी असावी ही बाब महाराष्ट्र शासनाला मराठा आरक्षण देताना अडचणीची ठरत आहे म्हणून माधुरी पाटील या प्रकरणातील न्याय निवाडा बदलणे किंवा त्यामध्ये काही एक दुरुस्ती करण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने राज्य शासनाला राज्याच्या विधानसभेला किंवा राज्याच्या विधान परिषदेला दिलेला नसल्यामुळे राज्य शासनाने एसओपी किंवा जीआर च्या आधारे या न्याय निवाडा बदलणे म्हणजे हा न्याय निवाडा अमान्य करुन त्यातील आदेश व निर्देश परस्पर बदलणे असे सिद्ध होऊन हा सन्माननीय घटना पिठाचा अवमान ठरू शकतो म्हणून माधुरी पाटील या प्रकरणातील न्याय निवाड्यातील आदेश दुरुस्त(मॉडीफाय) करून घेता येईल काय ?याची कायदेशीर माहिती भारताच्या सॉलिसीटर जनरल यांचे कडुन घेणार असल्याचे वक्तव्य शासनाच्या प्रतिनिधीने नुकतेच माध्यमा समोर केले आहे. कायदेशीर व घटनात्मक वेगळेच आहेत माधुरी पाटील न्यायनिवाडा आणि या निर्णया विरुद्ध (पुनर्विचार याचीका ) दाखल करणे कायदेशीर रित्या शक्य आहे, परंतु त्या साठी अत्यंत मर्यादित कारणे असणे आवश्यक आहे आणि अत्यंत महत्वाचे म्हणजे यास वेळेची मर्यादा लागू होते आणि रिव्हिव पिटीशन दाखल करण्यासाठी मान्य असलेले ऑर्डर रूल१ ऑफ सुप्रिम कोर्ट रुल्स नवीन व महत्त्वपूर्ण माहिती/साक्षी शोधली गेली जी सुनावणी वेळी दुर्लक्षित होती किंवा प्रस्तुत करता येत नव्हती अप्रत्यक्ष त्रुटी नैसर्गिक न्यायचे उल्लंघन असल्यास निर्णय झालेल्या तारखेपासून ३०दिवस पुर्ण होऊन गेलेले आहे (३२ वर्ष पुर्ण झाली आहेत ) आणि एवढ्या मोठ्या कालांतराने अथवा दिवसा नंतर रिव्हिव पिटीशन दाखल करणे कायदेशीर रीत्या शक्य नाही, (वेळेची मर्यादा संपली असल्यामुळे ). जरी खुप खुप प्रयत्न केले तरी जर नवीन न्याय्य व्यतिक्रम किंवा स्पष्ट कायदेशीर त्रुटी आढळलीअसेल तर क्युरेटीव्ह पिटीशन विचारात घ्या ( परंतु वेळेची अडचण आहेच )सध्याच्या कायदेशीर परिस्थितीत या जुन्या १९९४ निर्णया विरुद्ध नवीन अर्ज दाखल करण्याची शक्यता अत्यंत कमी आहे,अपवाद:किंवा जर त्या निर्णयाची अंमल बजावणी सध्याही चालू असेल आणि नवीन घटना घडली असेल,तर इम्प्लेमेंटेशन /एन्फोर्समेंट विषयक याचिका दाखल करता येईल ( पण रिव्हिव पिटीशन नाही). ही सामान्य कायदेशीर व घटनात्मक माहिती व प्रत्यक्ष कायदेशीर स्थिती आहे. सर्वोच्च न्यायालयात क्युरेटिव्ह पिटीशन (उपचारात्मक याचिका) दाखल करण्याची प्रक्रिया पाहिली तर क्युरेटिव्ह पिटीशन ही सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्याची सर्वात अंतिम आणि असाधारण कायदेशीर उपाय आहे. याचा मुख्य उद्देश गंभीर न्यायिक अन्याय झाला असल्यास सुधारणे हा आहे, जिथे सामान्य कायदेशीर प्रक्रिया तून न्याय मिळाली नाही. याचीका दाखल करण्याच्या अटीमहत्त्वपूर्ण बाब अशी आहे की,क्युरेटिव्ह पिटीशन साधारणता रिव्हिव पिटीशन खारिज झाल्यावरच दाखल करता येते, थेट दाखल करता येत नाही आणि हे करायचेच असेल तर त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे सीनियर विधीज्ञाचे सर्टिफिकेट अनिवार्य आहे. क्युरेटिव्ह पिटीशन ही अत्यंत दुर्लभ उपाय आहे सर्वोच्च न्यायालयात ०.१% पेक्षा कमी स्वीकारली जातात हे वास्तव्य आहे. महाराष्ट्र शासन राज्यात स्वतःचा वेगळा कायदा करू शकते काय? भारतीय राज्यघटनेत राज्य शासनाला सर्वोच्च न्यायालयाच्या घटना पीठाचा निर्णय बदलणे, दुरुस्त करणे, त्यात काही बाबी समाविष्ट करणे किंवा रद्द करण्याचा कोणताही अधिकार नाही.महत्त्वाचे घटनेचे तथ्य आणि घटनेचे कलम १४१ या प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाचा कायदा देशातील सर्व राज्यात किंवा त्यांच्या कार्य क्षेत्रात बांधन कारक आहे.परिच्छेद १४४ सर्व अधिकार व संस्थान सर्वोच्च न्यायालयाला मदत करणे बंधन कारक आहे. घटनेतील परिच्छेद ३६८: घटना दुरुस्तीचा अधिकार फक्त भारतीय संसदेस म्हणजेलोकसभा - राज्यसभेस आहे. यातील महत्वाची बाब आणि निष्कर्ष असा आहे की,राज्य शासनास घटनापीठाच्या निर्णया नुसार कार्यवाही करणे बांधन कारक आहे. निर्णय रद्द करण्यासाठी फक्त संसद घटनादुरुस्ती करू शकते, पण राज्य शासन स्वतःहून निर्णय बदलू शकत नाही किंवा घटनापीठाच्या निर्णयाला बदलण्याचा अधिकार फक्त सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णय दिलेल्या घटनापीठा पेक्षा मोठ्या घटना पीठास आहे जसे पाच न्यायधिशांच्या घटना पीठा पेक्षा मोठे सात - त्या पेक्षा मोठे नऊ -त्या पेक्षा मोठे अकरा -त्या पेक्षा मोठे घटनापीठ हे तेरा न्यायधिशांचे असावे लागते यांचे उदाहरण द्यायचे असेल तर स्वामी केशवानंद भारती विरुद्ध भारत सरकार हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या सन्माननीय १३ न्यायधिशांच्या घटनापीठा समोर सुनावणीस होते. आणि पूर्वीचा निर्णय ज्या घटना पीठा समोर झाला असेल त्या पेक्षा मोठे घटनापीठ(लार्जर बेंच) स्थापना सी जे आय म्हणजे भारताचे सर न्यायाधीशच करू शकतात. त्यामुळे राज्य शासनास असा काही एक कायदेशीर व घटनात्मक अधिकार मुळातच नाही.म्हणजेच राज्यघटनेत बदल/दुरुस्ती करण्याचा अधिकार परिच्छेद ३६८ प्रमाणे फक्त संसदेस आहे तो अधिकार विधिमंडळाला किंवा राज्य शासनाला अजिबात नाही.महत्त्वपूर्ण असे आहे की रिव्हिव पिटीशन न्यायालया च्या निर्णयाची पुनर्वाद करण्यासाठी नाही,तर फक्त स्पष्ट त्रुटी दुरुस्त करण्यासाठी आहे या साठी वेळेची मर्यादा असुन रिव्हिव पिटीशन ही निर्णय झालेल्या तारखेपासून ३० दिवसांत दाखल करावी लागते असे सामान्य कायदेशीर नियम आहेत.१९९४ चा निर्णय असल्याने, गेल्या ३२ वर्षा पेक्षा जास्त झालेल्या वर्षांत याचिका दाखल करण्याची वेळ संपली आहे क्युरेटिव्ह पिटीशन जर पुनर्वीचार याचीका खारिज झाली असेल,तरचउपचारात्मक याचीका दाखल करता येते, परंतु फक्त गंभीर न्याय्य व्यतिक्रम (ग्रेव्ह मीस कॅरेजेस ऑफ जस्टिस) असल्यास नैसर्गिक न्यायचे उल्लंघन असल्यास हा अंतिम उपाय आहे,परंतु १९९४ पासून ३२ वर्षापेक्षा पेक्षाही जास्त वर्षे झालेली असल्यामुळे उपचारा त्मक याचीका दाखल करण्याची वेळही संपली आहे त्यामुळे आमचे सातत्याने असलेले अभ्यासपुर्ण निवेदनच सतत सत्य ठरलेले असल्यामुळे कायद्या समोर किंवा घटनात्मक तरतुदी मध्ये कोणतेही "लाड" चालत नाही हे अंतिम सत्य सर्वांना मान्यच करावे लागेल अशी महत्वाची कायदेशीर व घटनात्मक बाब जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी पुढे आणली आहे. हीच बाब त्यांनी गेली अनेक वर्षे सातत्याने विविध आयोग यांचे समोर मांडलीअसुन अगदी याच वर्षी दस्तूर खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील व राज्य शासनाच्या प्रशासनिक अधिकारी यांचे समक्ष १८६ स्लाईड असलेले विविध न्याय निवाडे, त्यात दिलेले निर्णय अनुक्रमांक निहाय आणि पान निहाय हाय लाईट केलेले पी पी टी (पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन ) द्वारे अंत्यन्त अभ्यासु मांडणी केलेली असल्यामुळे शासनास काहीच माहीत नाही?हे म्हणताच येणार नसुन आम्ही या बाबत ज्यांचे कडे पुरावे आहेत त्यांना कुणबी प्रमाणपत्र देणे व ज्यांचे कडे पुरावे नाही त्या मराठा समाजा साठी स्वतंत्र आरक्षण कसे देता येईल यांचे कायदेशीर व घटनात्मक विश्लेषण सुद्धा दस्तूर खुद्द मुख्यमंत्री व समितीचे अध्यक्ष यांचे समोर सादर केलेले आहे.म्हणुन झालेल्या निर्णय तारखेपासून ३० दिवसां नंतर पुनर्वीचार याचीका दाखल करणे कायदेशीर रीत्या वेळेची मर्यादा संपली असल्यामुळे शक्य नाही. १९९४ निर्णया विरुद्ध नवीन अर्ज दाखल करण्याची शक्यता अत्यंत रेअर म्हणजे कमी आहे

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २३ जून २०२६


# विधवा सन्मान : समाजाच्या प्रगल्भतेचा खरा आरसा

दि. २३ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय विधवा दिन' म्हणून जगभरात पाळला जातो. हा दिवस केवळ एक औपचारिक स्मरणदिन नसून समाजातील अत्यंत संवेदनशील, अनेकदा दुर्लक्षित आणि शांतपणे वेदना सहन करणाऱ्या विधवा स्त्रियांच्या जीवनातील वास्तवाकडे पाहण्याची एक गंभीर संधी आहे. समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकास, औद्योगिकीकरण किंवा तंत्रज्ञानातील प्रगतीने होत नाही, तर त्या समाजात दुर्बल घटकांना मिळणारे सन्मान, सुरक्षा आणि समान संधी यावरून खऱ्या अर्थाने ठरते. या निकषावर पाहिले असता विधवा स्त्रियांची स्थिती हा समाजाच्या अंतर्मनाचा आरसा ठरतो. हा आरसा आपल्याला केवळ प्रगती दाखवत नाही, तर अनेक ठिकाणी असलेल्या असमानता, परंपरागत मानसिकता आणि सामाजिक उदासीनतेचेही स्पष्ट प्रतिबिंब दाखवतो. त्यामुळे हा दिवस केवळ स्मरणाचा नसून आत्मपरीक्षणाचा आणि कृतीचा दिवस आहे.विधवा स्त्रीचे जीवन हे अचानक कोसळलेल्या भावनिक व सामाजिक भूकंपासारखे असते. विवाहानंतर मिळालेला सहजीवनाचा आधार, भावनिक सुरक्षितता, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक ओळख पतीच्या निधनानंतर एका क्षणात बदलून जाते. त्या क्षणी तिच्या जीवनात केवळ दुःख नसते, तर अनिश्चितता, भीती, जबाबदाऱ्या आणि संघर्ष यांचा मोठा डोंगर उभा राहतो. मुलांचे संगोपन, घराचा आर्थिक भार, समाजाचा दृष्टिकोन आणि स्वतःच्या अस्तित्वाचा प्रश्न हे सर्व एकाच वेळी तिच्यासमोर उभे राहते. अशा परिस्थितीत अनेक स्त्रिया स्वतःच्या भावना बाजूला ठेवून कुटुंबासाठी जगण्याचा प्रयत्न करतात. त्या संघर्षाची किंमत मात्र समाज अनेकदा ओळखत नाही. हा अदृश्य संघर्ष या प्रश्नाची सर्वात मोठी शोकांतिका आहे.भारतीय समाजाच्या इतिहासात स्त्रीचे स्थान अनेक बदलांमधून गेले आहे. प्राचीन काळात काही प्रमाणात स्त्रीला शिक्षण, संपत्ती आणि निर्णयप्रक्रियेत सहभाग होता. परंतु कालांतराने सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक घटकांमुळे तिच्यावर बंधने वाढत गेली. विशेषतः मध्ययुगीन काळात सती प्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाहावर बंदी आणि कठोर सामाजिक रूढी यांनी स्त्रीचे जीवन अधिक कठीण केले. आधुनिक भारतात कायद्याच्या माध्यमातून या अमानुष प्रथांवर बंदी घालण्यात आली असली तरी समाजातील मानसिकता पूर्णपणे बदललेली नाही. आजही काही भागांमध्ये विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन अंधश्रद्धा, परंपरा आणि रूढींच्या चौकटीत अडकलेला दिसतो. त्यामुळे कायदेशीर प्रगती आणि सामाजिक मानसिकता यामध्ये एक मोठी दरी आजही अस्तित्वात आहे.विधवा स्त्रियांच्या जीवनातील सर्वात गंभीर समस्या म्हणजे आर्थिक असुरक्षितता. पतीच्या निधनानंतर कुटुंबाचा आर्थिक आधार अचानक नाहीसा होतो किंवा अत्यंत कमी होतो. ज्या स्त्रिया गृहिणी असतात, त्यांच्याकडे स्वतःचे उत्पन्नाचे साधन नसते. त्यामुळे त्या पूर्णपणे कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहतात. हे अवलंबित्व अनेकदा त्यांच्या स्वाभिमानावर परिणाम करते. काही वेळा त्यांचा आर्थिक निर्णयांवर अधिकारही कमी होतो. वारसा हक्क, मालमत्ता, बँक व्यवहार आणि सरकारी लाभ याबाबत त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. कायद्याने अधिकार दिले असले तरी प्रत्यक्ष जीवनात माहितीचा अभाव, कागदपत्रांची गुंतागुंत आणि सामाजिक दबाव यामुळे त्या अधिकारांचा उपयोग अनेकदा होत नाही. परिणामी आर्थिक स्वावलंबनाचा अभाव त्यांना दीर्घकाळ असुरक्षित ठेवतो.सामाजिक दृष्टिकोन हा या प्रश्नाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. समाजात अजूनही काही ठिकाणी विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सहानुभूतीचा नसून उपेक्षेचा आहे. तिला शुभकार्यांपासून दूर ठेवणे, तिच्या वेशभूषेवर निर्बंध घालणे, तिच्या उपस्थितीला अशुभ मानणे किंवा तिला दुय्यम स्थान देणे अशा अनेक प्रथा काही भागांमध्ये आजही दिसतात. या प्रथा केवळ अंधश्रद्धा नसून त्या मानवी प्रतिष्ठेच्या मूलभूत तत्त्वांना धक्का देणाऱ्या आहेत. स्त्रीचे मूल्य तिच्या वैवाहिक स्थितीवर ठरवणे ही मानसिकता समाजाच्या प्रगतीला अडथळा निर्माण करते. खऱ्या अर्थाने प्रगत समाज तोच असतो जिथे प्रत्येक व्यक्तीला तिच्या मानवी अस्तित्वावर सन्मान दिला जातो.मानसिक आरोग्याच्या दृष्टीने विधवा स्त्रियांची स्थिती अत्यंत संवेदनशील असते. जीवनसाथीचा मृत्यू हा एक गंभीर भावनिक आघात असतो. त्या आघातातून सावरण्यासाठी वेळ, आधार आणि सहानुभूती आवश्यक असते. परंतु सामाजिक अपेक्षा इतक्या तीव्र असतात की स्त्रीला स्वतःच्या दुःखासाठीही वेळ मिळत नाही. तिला लगेचच कुटुंबाची जबाबदारी स्वीकारावी लागते आणि समाजाच्या नियमांनुसार वागावे लागते. या प्रक्रियेत तिच्या भावनांना व्यक्त होण्याची संधी मिळत नाही. एकटेपणा, नैराश्य, भविष्याची अनिश्चितता आणि भीती या भावना तिच्या मानसिक आरोग्यावर खोल परिणाम करतात. मानसिक आरोग्याचे प्रश्न अनेकदा दिसत नाहीत, परंतु त्यांचा परिणाम संपूर्ण जीवनावर होतो.शिक्षणाचा अभाव आणि कायदेशीर जागरूकतेचा अभाव हे देखील मोठे अडथळे आहेत. ग्रामीण भागात अनेक स्त्रियांना त्यांच्या मूलभूत अधिकारांची माहिती नसते. वारसा हक्क, पुनर्विवाहाचा अधिकार, सरकारी योजना, पेन्शन सुविधा आणि सामाजिक सुरक्षा योजना याबाबत अज्ञान असल्यामुळे त्या अनेक लाभांपासून वंचित राहतात. केवळ कायदे तयार करून उपयोग नाही; त्यांची माहिती समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. कायदेशीर साक्षरता ही सक्षमीकरणाची पहिली पायरी आहे. माहितीशिवाय अधिकार निरर्थक ठरतात.सरकारने विधवा स्त्रियांसाठी विविध योजना राबवल्या आहेत. विधवा पेन्शन योजना, कौशल्य विकास कार्यक्रम, स्वयंरोजगार योजना आणि पुनर्वसन कार्यक्रम यांचा उद्देश त्यांना आत्मनिर्भर बनवणे हा आहे. मात्र या योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचताना अनेक अडचणी येतात. कागदपत्रांची गुंतागुंत, प्रशासकीय विलंब, माहितीचा अभाव आणि स्थानिक पातळीवरील उदासीनता यामुळे अनेक पात्र स्त्रिया या योजनांपासून दूर राहतात. त्यामुळे या योजनांची अंमलबजावणी अधिक सुलभ, पारदर्शक आणि मानवी दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे.पुनर्विवाहाचा मुद्दा समाजात अजूनही संवेदनशील मानला जातो. काही ठिकाणी पुनर्विवाह स्वीकारला जातो, तर काही ठिकाणी त्याला विरोध केला जातो. परंतु पुनर्विवाह हा स्त्रीच्या जीवनातील नवीन सुरुवातीचा मार्ग ठरू शकतो. तो तिच्या भावनिक स्थैर्यासाठी, सामाजिक स्वीकारासाठी आणि आर्थिक सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा ठरतो. स्त्रीचे जीवन केवळ एका घटनेपुरते मर्यादित नसते, तर ते सतत पुढे जाणारे असते. त्यामुळे पुनर्विवाहाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक मानवी, सकारात्मक आणि स्वीकारशील असणे आवश्यक आहे.शहरी आणि ग्रामीण भागातील परिस्थितीत मोठा फरक दिसून येतो. शहरी भागात शिक्षण, रोजगार आणि जागरूकता अधिक असल्यामुळे विधवा स्त्रियांचे सक्षमीकरण तुलनेने चांगले झालेले दिसते. परंतु ग्रामीण भागात परंपरा, अंधश्रद्धा आणि सामाजिक दबाव अधिक असल्यामुळे परिस्थिती अधिक कठीण आहे. तरीही स्वयंसेवी संस्था, महिला संघटना आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्या प्रयत्नांमुळे हळूहळू सकारात्मक बदल घडताना दिसत आहे. हा बदल मंद असला तरी दिशादर्शक आहे.आर्थिक स्वावलंबन हा सक्षमीकरणाचा सर्वात मजबूत पाया आहे. शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यास विधवा स्त्रिया आत्मनिर्भर होऊ शकतात. लघुउद्योग, हस्तकला, शेतीपूरक व्यवसाय, सेवा क्षेत्र, लघु व्यापार आणि डिजिटल कौशल्ये यामधून त्या स्वतःचे जीवन उभे करू शकतात. आर्थिक स्वावलंबन केवळ उत्पन्न देत नाही, तर आत्मसन्मान, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता वाढवते.समाजाच्या मानसिकतेत बदल घडवणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. कायदे आणि योजना असूनही जोपर्यंत समाजाचा दृष्टिकोन बदलत नाही, तोपर्यंत खरे परिवर्तन शक्य नाही. विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन दयेचा नसून समानतेचा असला पाहिजे. तिच्या अस्तित्वाला दुय्यम मानणे हे सामाजिक अन्यायाचे प्रतीक आहे. हा बदल केवळ नियमांनी नाही तर विचारांनी घडतो.माध्यमांची भूमिका या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाची आहे. माध्यमांनी विधवा स्त्रियांच्या प्रश्नांवर सातत्याने प्रकाश टाकणे आवश्यक आहे. त्यांच्या संघर्षकथा, यशोगाथा आणि प्रेरणादायी उदाहरणांमुळे समाजात सकारात्मक बदल घडू शकतो. शिक्षण व्यवस्थेची भूमिकाही निर्णायक आहे. शालेय स्तरावर लिंगभाव समानता, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय यांचे शिक्षण दिल्यास पुढील पिढी अधिक संवेदनशील बनेल.आंतरराष्ट्रीय पातळीवरही विधवा स्त्रियांच्या प्रश्नांकडे गंभीरतेने पाहिले जात आहे. अनेक देशांमध्ये त्यांच्या सक्षमीकरणासाठी विशेष धोरणे राबवली जात आहेत. लिंग समानता, गरिबी निर्मूलन आणि सामाजिक न्याय ही जागतिक उद्दिष्टे या प्रश्नाशी जोडलेली आहेत. त्यामुळे हा प्रश्न केवळ स्थानिक नसून जागतिक आहे.विधवा स्त्रियांचे सक्षमीकरण हे केवळ त्यांच्यासाठी नव्हे तर संपूर्ण समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. एक सक्षम स्त्री कुटुंबाला स्थैर्य देते, पुढील पिढी घडवते आणि समाजाला दिशा देते. त्यामुळे त्यांच्या विकासात गुंतवणूक करणे हे समाजाच्या भविष्यात गुंतवणुकीसारखे आहे.शेवटी असे म्हणता येईल की आंतरराष्ट्रीय विधवा दिन हा केवळ स्मरणाचा नाही तर आत्मपरीक्षणाचा आणि कृतीचा दिवस आहे. समाजाने स्वतःला विचारले पाहिजे की आपण विधवा स्त्रियांना कोणते स्थान देतो, त्यांना किती सन्मान देतो आणि त्यांच्या हक्कांसाठी किती सक्रिय आहोत. सहानुभूती पुरेशी नाही; सन्मान, समानता आणि सक्षमीकरण हीच खरी गरज आहे. विधवा स्त्री ही दयेची नव्हे तर अधिकारांची, आत्मनिर्भरतेची आणि सन्मानाची प्रतीक आहे ही जाणीव समाजात दृढ करणे हीच या दिनाची खरी प्रेरणा आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे,**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

ईमेल – bagate.rajendra5@gmail.com



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002